महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,बाबूपेठ ,चंद्रपूर -४४२४०३
फोन न.-०७१७२-२२५१ ई.मेल- diet.chandrapur@gmail.com

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर

## हॅकेथॉन स्पर्धा नियमावली - 2025-26

### प्रस्तावना :-

शिक्षणाच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत आहे आणि शिक्षक व कर्मचारी हे या बदलाचे मुख्य केंद्रबिंदू आहेत. शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था अधिक परिणामकारक बनविण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधणे ही काळाची गरज आहे, याच विचाराला केंद्रस्थानी ठेवून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे शिक्षक तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी हॅकेथॉन स्पर्धा आयोजित करत आहे, यात शिक्षक आणि कर्मचारी एकत्र येऊन शैक्षणिक व सामाजिक प्रक्रियेतील आव्हाने सोडवण्यासाठी अभिनव उपाय शोधणार आहेत.

### उद्दिष्ट :-

1. शैक्षणिक व सामाजिक प्रक्रियेतील अडचणी सोडवण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधणे.
2. शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल साधनांचा वापर करण्यास प्रेरित करणे.
3. संस्थेच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक प्रक्रियांत सुधारणा घडवणे.
4. सहभागींना त्यांचा सर्जनशील दृष्टिकोन आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

### हॅकेथॉन स्पर्धेचे विषय :-

**1. पर्यावरण आणि शाश्वत विकास (Environment and Sustainability)**

- कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पुनर्वापर तंत्रज्ञान
- पाण्याच्या बचतीसाठी स्मार्ट तंत्रज्ञान.
- पर्यावरण संवर्धनासाठी ड्रोनचा उपयोग.
- शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज व सूचना प्रणाली.

**2. आरोग्य आणि वैद्यकीय सेवांची सुधारणा (Healthcare and Wellness)**

- आरोग्य देखरेखेसाठी AI आधारित वैद्यकीय सहाय्य.
- ग्रामीण भागासाठी कमी खर्चातील टेलिमेडिसिन सोल्यूशन्स.
- मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञान.
- आरोग्यासाठी पोषणतत्त्व ट्रॅकिंग ॲप्स.

**3. शिक्षण आणि कौशल्य विकास (Education and Skill Development)**

- विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक शैक्षणिक प्लॅटफॉर्म,
- शिक्षकांसाठी आभासी(VR) प्रशिक्षण मॉड्यूल.
- वंचित मुलांना शिक्षण पोहोचवण्यासाठी स्मार्ट ॲप्स.
- भाषा शिक्षणासाठी AI आधारित संवाद साधन.
- परीक्षांसाठी कागदविरहित व सुरक्षित प्रणाली.

**4. स्मार्ट शहर आणि ट्रान्सपोर्टेशन (Smart Cities and Transportation)**

- स्मार्ट वाहतूक नियोजनासाठी रिअलटाइम डेटा ॲनालिटिक्स-.
- सोलर.आधारित स्मार्ट स्ट्रीट लाइट सिस्टम-
- पार्किंग स्पेस व्यवस्थापन.
- सार्वजनिक वाहतूक सुधारण्यासाठी टोकनलेस पेमेंट सिस्टम.
- स्मार्ट कचरा संकलन.

**5. आर्थिक समावेशन आणि फिनटेक (Financial Inclusion and FinTech)**

- ग्रामीण भागातील आर्थिक साक्षरतेसाठी डिजिटल साधने.
- लहान व्यवसायांसाठी कर्ज सहाय्य व्यवस्थापन उपाय.
- वैयक्तिक आर्थिक नियोजनासाठी AI आधारित सहाय्य.
- सायबर सुरक्षा आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट तंत्रज्ञान.

**6. गेमिंग आणि मनोरंजन (Gaming and Entertainment)**

- वैयक्तिकृत अनुभवांसाठी AR/VR आधारित गेम्स.
- डिजिटल वाचनासाठी संवादात्मक प्लॅटफॉर्म.
- संगीत आणि कला सर्जनासाठी AI आधारित साधने.
- सामाजिक मुद्यांवर आधारित शैक्षणिक खेळांची निर्मिती.
- लाइव्ह इव्हेंट्ससाठी व्हर्चुअल अनुभव.

**7. सामाजिक समस्या आणि सक्षमीकरण (Social Issues and Empowerment)**

- महिलांच्या सुरक्षेसाठी स्मार्ट वियरेबल डिव्हाइस.
- दिव्यांगांसाठी सहाय्यक उपकरणे.
- ग्रामीण क्षेत्रासाठी जलद आपत्ती प्रतिसाद सिस्टीम.
- अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी उत्पादन मार्केटिंग प्लॅटफॉर्म.
- मतदार जनजागृतीसाठी डिजिटल मोहिमेचे साधन.

**8. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रमानव (AI and Robotics)**

- उद्योगांसाठी ऑटोमेशन प्लॅटफॉर्म तयार करणे.
- ग्राहक सेवा सुधारण्यासाठी चॅटबॉट्स.
- रोबोटिक्सवर आधारित स्मार्ट घरगुती उपकरणे.
- ड्रोन तंत्रज्ञानासाठी नवीन उपयोजन.
- डेटा गोपनीयतेसाठी AI साधन.

**9. ग्रामीण विकास) Rural Development)**

- स्थानिक रोजगार निर्मितीसाठी प्लॅटफॉर्म.
- ग्रामीण आरोग्य सेवा वितरण सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञान.
- गावांमधील मुलभूत सुविधा सुधारण्यासाठी स्मार्ट उपाय.

- पाणी वितरण आणि व्यवस्थापन.
- शेतीसाठी अचूकता) आधारित उपाय-Precision Farming).

**10. क्रिएटिव्ह टेक आणि गॅझेट्स (Creative Tech and Gadgets)**

- स्मार्ट होम सोल्यूशन्स.
- वैयक्तिक तंदुरुस्ती ट्रॅकरसाठी नवीन उपकरणे.
- प्रोटोटायपिंगसाठी 3D प्रिंटिंग आधारित सोल्यूशन.
- मिनी रोबोट्स डिझाइन करणे.

## स्पर्धेचे नियम :-

1. स्पर्धत शालेय शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी सहभागी होऊ शकतात.

2. प्रतिकृती ही सर्जनशील, नवीन दृष्टिकोन निर्माण करणारी, नावीन्यपूर्ण व उपयोजनात्मक असावी.

3. प्रतिकृती सहभागींनी स्वतः तयार केलेली असावी.

4. कुठल्याही प्रसार माध्यमामधून किंवा  या पूर्वी ज्या प्रतिकृतींना कॉपीराइट्स प्राप्त झाले आहेत अशा प्रतिकृती नसाव्यात.

5. प्रतिकृती कुटुंब, समाज, देश यांना विकासात्मक फायदा होईल अशी असावी.

6. सहभागी स्पर्धकाने यापूर्वी सदर प्रतिकृती इतर कुठल्याही स्पर्धेत सादर केलेली नसावी.

7. सदर प्रतिकृती तयार करण्यासाठी शासकीय स्तरावरून कुठलीही आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

8. प्रतिकृती चे चित्रीकरण व माहितीचा चार्ट तयार करणे बंधनकारक असेल.

9. दिलेल्या विषयापैकी कोणत्याही एका विषयात स्पर्धत सहभागी होऊ शकतो.

10. स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपली नोंदणी 31 ऑक्टोबर 2025 पर्यंत करावी.

11. सदर स्पर्धा ही तालुका, विभाग व राज्य स्तरावर होणार आहे.

12. सहभागासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

13. प्रतिकृतीस क्रमांक प्राप्त झाल्यास ती कॉपीराइट्सची उल्लंघन करणारी आढळल्यास ती अपात्र ठरेल. प्राप्त बक्षीस सुद्धा परत घेण्यात येईल. याबाबत निवड समिती आणि मूल्यमापन समितीचा निर्णय अंतिम असेल.

14. स्पर्धेमध्ये प्रतिकृतीसह स्वतः उपस्थित राहावे लागेल आपल्या ऐवजी आपला प्रतिनिधी उपस्थित ठेवता येणार नाही.

15. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला स्वयंघोषणा प्रमाणपत्र भरून देणे अनिवार्य आहे.

16. स्पर्धेसाठी तालुका स्तरावर एक विजयी स्पर्धक, विभाग स्तरावर 5 विजयी स्पर्धक व राज्य स्तरावर 10 विजयी स्पर्धक निवडण्यात येईल.

## परीक्षण निकष :-

**1. संकल्पना आणि नाविन्यता (10 गुण )**

- प्रकल्पाची कल्पना किती नाविन्यपूर्ण आहे?
- संकल्पनेमध्ये सर्जनशीलता दिसून येते का?
- समस्या सोडवण्यासाठी प्रकल्पाची उपयुक्तता किती प्रभावी आहे?

**2. विषयाची सुसंगतता (10 गुण )**

- प्रकल्प निवडलेला विषय हॅकेथॉन प्रदर्शनीशी सुसंगत आहे का?
- सामाजिक, वैज्ञानिक किवा शैक्षणिक दृष्टिकोनातून त्याचा परिणाम होतो का?

**3. तांत्रिक अचूकता (10 गुण )**

- प्रकल्प वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित आहे का?
- गणितीय व तांत्रिक माहिती योग्य प्रमाणात वापरली आहे का?

**4. प्रदर्शन आणि सादरीकरण कौशल्य (10 गुण )**

- प्रकल्पाचे मॉडेल व्यवस्थित सादर केले आहे का?
- प्रकल्पाचे स्पष्टीकरण देताना आत्मविश्वास आणि स्पष्टता आहे का?
- प्रेक्षकांना प्रकल्पाचे महत्व समजावून देण्यात यशस्वी ठरतो का?

**5. कृतीक्षमतेचे मूल्यांकन (10 गुण )**

- प्रकल्प प्रत्यक्ष जीवनात उपयोगी ठरेल का?
- त्याच्या अंमलबजावणीची शक्यता किती आहे?

**6. साहित्याचा वापर आणि डिझाईन (10 गुण )**

- प्रकल्प तयार करताना वापरलेल्या साहित्याचा प्रभावीपणा आहे का?
- मॉडेलचे डिझाइन सौंदर्यपूर्ण, टिकाऊ आणि सुलभ आहे का?

**7. प्रकल्पाच्या परिणामाचा आवाका (10 गुण )**

- प्रकल्पाचा सामाजिक, आर्थिक किंवा पर्यावरणीय परिणाम किती सकारात्मक आहे?
- मोठ्या प्रमाणावर त्याची अंमलबजावणी करता येईल का?

**8. प्रकल्पाचे दस्तऐवजीकरण (10 गुण )**

- प्रकल्पासाठी योग्य प्रकारे अहवाल तयार केला आहे का?
- आवश्यक डेटा, चार्टस, आणि आकडेवारी समाविष्ट केली आहे का?

**9. प्रश्नोत्तर सत्रातील कामगिरी (10 गुण )**

- परीक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समाधानकारक उतरे दिली का?
- आपले म्हणणे पटवून देण्यात यशस्वी झालेत का?

## सहभागी स्पर्धकाचे स्वयं घोषणा पत्र

मी श्री श्रीमती कुमारी ............................................................ शाळा/कार्यालय..................................पंचायत समिति ..................................................याद्वारे जाहीर करत आहे की, या स्पर्धेत मी स्वतः तयार केलेली प्रतिकृती असून मी तिची नक्कल कुठल्याही सोशल मीडियाच्या ऑनलाईन माध्यमातून किंवा प्रिंट मीडियाच्या माध्यमातून केलेली नसून ही माझी स्वतःची निर्मिती आहे. माझ्याकडून पुरविण्यात आलेली माहिती जर कॉपीराईटचे उल्लंघन करणारी आढळली तर मी स्पर्धा जिंकल्यावर सुद्धा अपात्र होईल व याबाबतीत मूल्यमापन समितीने घेतलेला निर्णय मला मान्य राहील.

दिनांक

स्थळ

स्पर्धकाचे नाव व स्वाक्षरी